**नि. दि. दा. क्र.९८/२०२१**
**सतिश वि. ज्ञानेश्वर व इतर**
**निशाणी क्र. ५२ खाली**

**वादीचा पुढील सरतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. आर. एच. कर्णे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

मी प्रस्तुत दाव्यामध्ये माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. ते मला दाखविले. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास यापूर्वी नि.क्र.५२ देण्यात आली आहे. आता मला दाव्यासोबत दाखल केलेले वाटणीपत्र क्र.४०६३/२०१५ दाखवण्यात आले, सदरचे वाटपपत्र माझ्यात व वडीलांमध्ये झाले होते त्यास माझा भाऊ बापु गावडे याने संमती दिली. सदरचे वाटपपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. सदर वाटपपत्रावर माझी, वडीलांची व माझ्या भावाची सही आहे. सदर वाटणीपत्रावर विजय गावडे व धनंजय गावडे यांच्या साक्षीदार म्हणून सह्या आहेत. सदर नोंदणीकृत वाटपपत्रास **निशाणी क्र. ६०** देण्यात येत आहे. आता मला दिनांक ०१/०३/२०१९ रोजीचा करारनाम्याची छायांकीतप्रत दाखविण्यात आली (वादींना निशाणी ५० प्रमाणे दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आली आहे.) सदर करारनाम्यावर माझी व भावाची सही आहे, प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. ३ ची आई अनुसया गावडे यांचे अंगठे आहेत. सदर करारनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६१** देण्यात येत आहे. मी संचीकेवर एफ आय आर क्र. ९६/२०१६ ची सत्यप्रत दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. ६२** देण्यात येत आहे. मी संचीकेवर फेरफार क्र. ११०, ९४ आणि २०२० यांच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना **निशाणी क्र. ६३ ते ६५** देण्यात येत आहेत.

( वादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब )

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस. साटोटे)
दिनांकः ०६.१२.२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, फलटण

**नि. दि. दा. क्र.९८/२०२१**
**सतिश वि. ज्ञानेश्वर व इतर**
**निशाणी क्र. ५२ खाली**

**वादीच्या विधीज्ञांनी अधिक कागदोपत्री पुरावा दाखल करणेचा नसल्याबाबतची नि.क्र.६६ ला पुरसिस दिल्याने वादीचा पुढील सरतपास बंद करण्यात आला. प्रतिवादींचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. करीता, प्रतिवादींतर्फे उलटतपास नाही.**

फलटण.
दिनांकः १३.०१.२०२६

(ए.एस. साटोटे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, फलटण